Satara Edition_23 Sep_006
23 Sep 2024

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

# तंत्रज्ञानामुळे सायबर गुन्हेगारीत वाढ : माने

**सातारा, दि. २२ (प्रतिनिधी)** - माहिती व तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे अनेक गोष्टी सुलभ झाल्या आहेत. मात्र, तेवढ्याच प्रमाणात सायबर गुन्हेगारी वाढली आहे. यासाठी 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमातून जनजागृती केली जात आहे. सायबर गुन्हेगारी रोखण्यासाठी सावधगिरी आवश्यक आहे. अनेक बाबींची माहिती व खबरदारी घेतल्यास या गुन्हेगारीला आळा बसू शकतो, असे मत केबीपी मॅनेजमेंट रिचर्सची विद्यार्थिनी पूर्वा माने हिने व्यक्त केले.

रयत शिक्षण संस्थेच्या वर्ये, ता. सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट रिसर्च आणि क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमातून विद्यार्थिनी पूर्वा माने व जयंता पवार यांनी जिल्हा शासकीय रुग्णालयात सायबर गुन्हेगारीबद्दल सविस्तर माहिती दिली.



**सातारा : जिल्हा रुग्णालयातील जनजागृती कार्यक्रमात वैद्यकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांसमवेत पूर्वा माने व जयंता पवार.**

'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' उपक्रम सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी सामाजिक बांधिलकीतून राबवला जात आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांनी अँड्रॉइड मोबाइलवरील सेटिंग, उपाय, फायदे, त्याचे नियम, सुरक्षित लिंक, स्ट्राँग पासवर्ड, फ्रॉड लिंक कशा ओळखायच्या, सायबर गुन्हे कोणते, त्यापासून आपण आपले संरक्षण कसे करावे, याविषयी माहिती देऊन प्रात्यक्षिकाद्वारे जनजागृती केली.

आज समाजात गुन्हेगारीचे जाळेच पसरले आहे. लहानांपासून वयोवृद्धांपर्यंत लोक यामध्ये गुरफटत चालले आहेत. त्यांना योग्य मार्गदर्शन आणि मदत करण्यासाठी बीसीए विद्यार्थी व क्विक हिल फाउंडेशन यांनी खारीचा वाटा म्हणून हा उपक्रम यशस्वीरित्या राबवला. या उपक्रमामुळे जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सायबर सुरक्षेबाबत माहिती मिळाली.